# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०४/२०२४ (सोमवार) सकाळ**


---

## घरफोडी करणारी आंतरराज्यीय अट्टल चोरांची टोळी जेरबंद
## ४,३३,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त
## (नागपूर ग्रामीणची कारवाई)

नागपूर ग्रामीण घटकाअंतर्गत घरफोडी करुन चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात विशेष पथके तयार केले. विशेष पथकाने जिल्हयातील विवीध पोलीस स्टेशनला नोंद गुन्हयांचा अभ्यास करुन प्रत्येक घरफोडीच्या घटनेमधील आरोपींच्या गुन्हे करण्याच्या कार्यपध्दतीवर केंद्र लक्षीत करुन समांतर तपास सुरु केला. तपासादरम्यान प्राप्त गोपनिय माहीतीचे आधारे रेकॉर्ड वरिल गुन्हेगार नामे गोलू रेवडीया रा. शेष नगर मानेवाडा, नागपूर यांचा काटोल येथील घरफोडी गुन्हंयामध्ये सहभाग असल्याची खात्रीशीर माहीती समोर आल्याने पथकाव्दारे त्याचा तात्काळ शोध सुरू करून त्यास बैतुल (मध्यप्रदेश) येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडे बारकाईने विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर दोन साथीदार नामे पंकज श्रावण खाकरे, वय ३० वर्ष रा. पिपळा फाटा, नागपूर व रोहीत गुणवंता खापेकर वय २८ वर्ष रा. तांडपेठ, नागपूर यांचे सह मिळुन नागपूर ग्रामीण जिल्हयात काटोल, नरखेड, कोंढाळी, केळवद, रामटेक आणि जिल्हा भंडारा, यवतमाळ येथील भागात विवीध ठिकाणी घरफोडी करुन सोने चांदीचे दागीने चोरी केल्याचे सांगीतले व चोरी केलेले दागीने नागपुर येथील सोनार दुकानदारांना गहाण व विकल्याची माहिती दिली. सोनार दुकानदार यांचेकडून खालील नमुद पोलीस स्टेशन हद्दीत झालेल्या घरफोडीच्या घटनेतील चोरी गेलेले एकुण ५३ ग्रॅम सोने बाजारभाव किंमती ३,३३,०००/—रू, नगदी १०,०००/—रू., गुन्हयात वापरलेली एक दुचाकी वाहन किंमत ७०,०००/— रुपये व दोन मोबाईल किमती २०,०००/— रुपये असा एकुण ४,३३,०००/— रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. वरील दोन्ही आरोपीतांकडून नागपूर ग्रामीण, भंडारा, यवतमाळ जिल्हयातील असे एकुण १२ गुन्हे उघड करण्यात आले आहे.

**नागपूर ग्रामीण येथील**

१) पो.स्टे. काटोल गुन्हे रजि.नं. १९६/२०२४ कलम ४५४, ३८० भादंवि

२) पो.स्टे. काटोल गुन्हे रजि.नं. १०९/२०२४ कलम ४५४, ३८० भादवि

३) पो.स्टे. काटोल गुन्हे रजि. नं. १४५/२०२४ कलम ४५४, ३८० भादवि

४) पो.स्टे. नरखेड गुन्हे रजि. नं. ३९/२०२४ कलम ४५४, ३८० भादवि

५) पो.स्टे. नरखेड गुन्हे रजि.नं. ३४०/२०२३ कलम ४५४, ३८० भादवि

६) पोस्टे कोंढाळी गुन्हे रजि.नं. २८५/२०२४ कलम ४५४, ३८० भादवि
७) पोस्टे केळवद गुन्हे रजि.नं. ३४०/२०२३ कलम ४५४, ३८० भादवि.
८) पोस्टे रामटेक गुन्हे रजि. नं. ९५०/२०२३ कलम ४५४, ३८० भादवि.
९) पोस्टे भंडारा अप.क्र. १८०/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि.
१०) पोस्टे भंडारा अप.क्र. १८०/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि.
११) कारधा जि. भंडारा अप. क्र. १०७/२०२४ कलम ४५४, ४५७,३८० भादवि.
१२) पोस्टे वणी जि. यवतमाळ अप. क्र. ६१/२०२४ कलम ४५४, ३८० भादवि.

कार्यवाही पथक मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार सर भापोसे तसेच अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मा. ओमप्रकाश कोकाटे स्था. गु. शा. सपोनि आशिष सिंग ठाकूर, पो उप नि आशिष मोरखडे, स फौ चंद्रशेखर गडेकर, स फौ सूरज परमार, पो हवा सफौ महेश जाधव, अरविंद भगत, पो हवा दिनेश अधापुरे, पो हवा प्रमोद तभाने, पो हवा गजेंद्र चौधरी, पो हवा रंजीत जाधव पो हवा संजय बांते, रोहन डाखोरे, पो शी राकेश तालेवार, चा पो शी आशुतोष लांजेवार, चालक अमोल कुथे, सायबर सेलचे सतिश राठोड, संगिता यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर